# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
### वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.10.2024** **वार – मंगळवार**

---

पदभार

लेफ्टनंट जनरल श्रींजय प्रतापसिंह यांनी आज पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाच्या प्रमुख पदाची सूत्र स्वीकारली. पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आणि देहरादूनच्या भारतीय सैन्य प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी असलेले लेफ्टनंट जनरल श्रींजय प्रतापसिंह 10 जून 1989 रोजी भारतीय लष्करात रुजू झाले होते. त्यांनी आतापर्यंत लष्करातील विविध महत्त्वपूर्ण पदांची जबाबदारी सांभाळली आहे.

मनपा

पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने सार्वजनिक जागी थुंकणे, कचरा जाळणे, अस्वच्छता करणे, अशा कारणांसाठी दंडात्मक कारवाई केली जाते. गेल्या वर्षभरात सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या माध्यमातून महापालिकेने सव्वा कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी गेल्या वर्षभरात 60 हजाराहून अधिक पुणेकरांवर ही दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती घनकचरा विभागाचे प्रमुख आणि महापालिका उपायुक्त संदीप कदम  यांनी दिली

स्वच्छता

पुणे शहरात अत्याधुनिक यंत्र सामग्री वापरून नाले स्वच्छता केली जाणार असून त्यासाठी तीन कोटी 53 लाख रुपयांच्या निविदांना स्थायी समितीनं मंजुरी दिली आहे. शहरात अनेक ठिकाणी नाले अरुंद असून तिथे अन्य यंत्र किंवा मनुष्यबळाचा वापर करता येत नाही. पावसाळ्यापूर्वी नालेस्वच्छता न झाल्यास वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याचा धोका असतो; त्यामुळे ही अत्याधुनिक यंत्र वापरण्यात येणार आहेत.

नवरात्र
येत्या गुरुवारी सुरू होत असलेल्या नवरात्रोत्सवासाठी पुण्यातील विविध मंदिरांमध्ये जय्यत तयारी सुरू आहे. घराघरातही घटस्थापनेची तयारी सुरू आहे. दहा दिवसांच्या या उत्सवाची सांगता 12 ऑक्टोबर म्हणजेच विजयादशमीच्या दिवशी होणार आहे.
दरम्यान, 30 व्या पुणे नवरात्र महोत्सवाचं उद्घाटन घटस्थापनेच्या  दिवशी कॉंग्रेस महासमितीचे सरचिटणीस रमेश चेन्निथला आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते गणेश कला क्रीडामंच इथं होणार आहे. या महोत्सवात ज्येष्ठ संपादक राजीव खांडेकर, माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण यांच्यासह विविध मान्यवरांना 'श्री लक्ष्मीमाता  जीवन गौरव पुरस्कार' देऊन गौरवलं जाणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष आबा बागुल यांनी दिली.

ज्येष्ठनागरिक
ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी दरवर्षी 1 ऑक्टोबर हा दिवस 'ज्येष्ठ नागरिक दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आज पुण्यात समाज कल्याण विभागानं विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. अनेक स्वयंसेवी संस्था संघटनांनीही आज ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रमांचं आयोजन केलं आहे.

पिंपरी चिंचवड
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं शाळाबाह्य मुलांच्या पुनर्नोंदणीचा व्यापक उपक्रम सुरू केला आहे. मुख्याध्यापकांना शक्य तितक्या मुलांची, विशेषत: असुरक्षित भागातील मुलांची नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असं महापालिकेच्या शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त  विजयकुमार थोरात यांनी म्हटलं आहे.

पुर्वसुचना
पुणे जिल्हयात परतीच्या पावसामुळे अनेक शेतपिकांचं नुकसान झालं आहे; संबंधित शेतकऱ्यांनी त्यांच्या पीक नुकसानाची माहिती संबंधीत विमा कंपनीला 72 तासामध्ये कळवावी, असं आवाहन कृषी विभागाच्या पुणे जिल्हा अधिक्षक कार्यालयानं केलं आहे. पिकांच्या नुकसानाबाबतची माहिती पिक विमा कंपनीकडे नोंदवण्यासाठी पिक विमा ॲप; कृषि रक्षक पोर्टल किंवा 14447 या टोल फ्री क्रमांकाचा वापर करावा, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.
दरम्यान, राज्यात गेल्या वर्षीच्या खरीप हंगामामध्ये नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा ,चंद्रपूर आणि  जळगांव जिल्ह्यात झालेल्या पिकांच्या नुकसानापोटी प्रलंबित पीक विम्याची रक्कम देण्यासाठी एक हजार 927 कोटी रुपये मंजूर केले आहेत. आता लवकरच संबंधित जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या

पीक विम्याची नुकसान भरपाई बँक खात्यावर जमा होईल, अशी माहिती कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी दिली आहे.

गुटखा

गुटख्याचा साठा करून छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्या दोघांना पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. रास्ता पेठ परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडून सुमारे 11 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

क्रीडा

पुणे जिल्हा स्नूकर आणि बिलियर्ड संघटना आगामी काळात शहरात वर्षभरात 15 विविध जिल्हास्तरीय स्पर्धांचं आयोजन  करणारं आहे. यामधून सर्वोत्कृष्ट चार खेळाडूंची निवड करण्यात येणार असून हे खेळाडू डिसेंबर महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष एडमंड सँचेस यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

हवामान

पुणे आणि परिसरात आज कमाल 34 तर किमान 21 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस तापमानची नोंद झाली. उद्या आकाश अंशतः ढगाळ असेल आणि तापमान साधारण असंच असेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.